# शासकीय तंत्रनिकेतन, साकोली

जि. भंडारा (महाराष्ट्र) – ४४१८०२

दुरध्वनी क्र.: ०७१८६–२३७४७० प्राचार्य २३६२०६ (कार्यालय/फॅक्स)

ईमेल : stores.gpsakoli@dtemaharashtra.gov.in वेबसाईट : www.gpsakoli.ac.in

डॉ.अशोक उपाध्याय [बी.ई. (सिव्हील इंजि.), एम.टेक., पीएच.डी. (आय.आय.टी.बी.एच.यु/एन.एन.आय.टी.ए.)] ईमेल : akluphd@gmail.com


निविदा/दरपत्रक

क्र. शातंनिसा/कर्मशाळा/निर्लेखन/2019/ 24

दिनांक :– 04 JUN 2019

विषय :– निर्लेखित यंत्र सामुग्री/उपकरणे/साहित्य विक्रीसाठी दरपत्रके मागविण्याबाबत

संस्थेतील निर्लेखित यंत्र सामुग्री/उपकरणे/साहित्य यांच्या विक्रीसाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत. खालील नमुद अटी व शर्तींच्या अधिन राहुन सोबत दिलेल्या नमुना फॉर्ममध्ये आपले दर सादर करावेत.

१) संस्थेतील निर्लेखित यंत्र सामुग्री/उपकरणे/साहित्य ज्या स्थितीत आहेत त्याच स्थितीत विक्री करण्यात येईल.

२) प्रत्येक स्वतंत्र लॉटची वेगवेगळी किंमत नमुद करण्यात यावी. प्रत्येक लॅाटची एकत्रित किंमत प्रति क्विंटल/प्रतिकिलो इत्यादी पध्दतीने नमुद करु नये. वेगवेगळया लॅाटची एकत्रित किंमत नमुद केल्यास आपले निविदा/दरपत्रक रद्द करण्यात येईल.

३) निविदा भरतांना सोबत अनामत रक्कम (EMD) म्हणुन सोबत "प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन साकोली" यांचे नावे रुपये ५,०००/– चा राष्ट्रीयकृत बॅंकेचा रेखांकीत डिमांड ड्राफ्ट (D.D.) जोडावा.

४) जास्तीत जास्त किंमतीचे दर मंजुर झाल्यानंतर सर्वाधिक दर नमुद/किंमत देवु करणा–या खरेदीधारकास कार्यालयीन आदेशानुसार एकत्रित रोख रक्कम कार्यालयीन आदेशाचे दिनांकापासुन ३ दिवसांचे आत (शासकीय सुट्टीचे दिवस वगळुन) कार्यालयात भरणे बंधनकारक राहील.

५) रोख रक्कमेचा भरणा केल्यानंतर आपणास मंजुर झालेल्या लॅाटची (निर्लेखित यंत्र सामुग्री/उपकरणे इत्यादी) ची उचल तात्काळ करुन सदर साहीत्य संस्थेबाहेर नेण्याची व्यवस्था आपणास करावी लागेल.

६) साहीत्याची उचल करतांना आवश्यक हमाली खर्च व वाहतुक खर्च आपणास करावा लागेल.

७) साहीत्याची उचल करतांना संस्थेच्या इमारतीची तोडफोड न करता सुरक्षितपणे साहीत्य/यंत्र सामुग्री/उपकरणे नेण्यात यावेत.

८) नामंजुर निविदाधारकाची अनामत रक्कम (EMD) विक्री प्रक्रीया पुर्ण झाल्यावरच परत करण्यात येईल. विक्री प्रक्रीयेदरम्यान अनामत रक्कमेची मागणी करु नये.

९) निविदाकारांनी निविदा सादर करण्यापुर्वी लॅाटची पाहणी दि. ०६/०६/२०१९ पासुन ते दि. १५/०६/२०१९ या कालावधीत करावी. निविदा/दरपत्रके दि. १८/०६/२०१९ रोजी सायं. ५:०० वा. पर्यंत स्विकारण्यात येतील. यानंतर प्राप्त होणा–या निविदा/दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही.

१०) निविदा/दरपत्रके दि.१९/०६/२०१९ रोजी स. ११:०० वाजता उघडण्यात येतील.



Scanned by CamScanner